Open Access

उदयगिरी - बहुभाषिक इतिहास संशोधन पत्रिका

(A Bimonthly, Refereed, & Peer Reviewed Journal of History)

Published by: AAASSHER, Mumbai, (MS) India

Journal homepage: https://udayagiri.aaassher.org/

ISSN (Online): 2583-8423

Volume 1, Issue 4, October 2023; Pages 140 – 143

DOI: 10.5281/zenodo.10071016

Original Research Article

# महात्मा गांधीजींचे औद्योगिकीकरण विषयक विचार : एक अभ्यास

प्रा. डॉ. सूर्यवंशी भंडाजी रंगराव

सहाय्यक प्राध्यापक व विभाग प्रमुख, अर्थशास्त्र विभाग, कर्मवीर मामासाहेब जगदाळे महाविद्यालय, वाशी ता. वाशी, जिल्हा: धाराशिव ४१३५०३ महाराष्ट्र, भारत

*Corresponding author E-mail*: suryawanshibhandaji@gmail.com

Received: 10 October, 2023 | Accepted: 25 October, 2023 | Published: 26 October, 2023

## गोषवारा

भारतातील वाढती लोकसंख्या, वाढत्या शहरीकरणामुळे बेकारी, दारिद्र्य, आरोग्य विषयक समस्या आज उग्र स्वरूप धारण करत आहेत. त्यांची सोडवणूक करून मानवी जीवन समृद्ध करण्यासाठी महात्मा गांधीजींनी मांडलेले औद्योगिकीकरण विषयक विचार आजच्या भारतीय अर्थव्यवस्थेच्या शाश्वत आर्थिक विकासाला मार्गदर्शक आहेत. महात्मा गांधीजींच्या औद्योगिकीकरण विषयक विचारांचे विवेचन करून प्रत्यक्ष अर्थव्यवस्थेत त्यांची अंमलबजावणी करणे आवश्यक आहे. तसेच आर्थिक स्वार्थ साध्य करण्यासाठी आजचे वाढते औद्योगिकीकरण, यांत्रिकीकरणाचा वाढता वापर व त्यातून वाढलेल्या शहरीकरणामुळे आज अनेक समस्या निर्माण झाल्या आहेत. औद्योगिकीकरण, यांत्रिकीकरणातून निर्मान झालेल्या समस्यांच्या सोडवणूकीचा मार्ग महात्मा गांधीजींनी या समस्या बाल्य अवस्थेत असतानाच विशद केल्यामुळे महात्मा गांधीजींच्या दूरदृष्टीपणाचे अध्ययन देखील या शोधनिबंधात करण्यात आले आहे.

## सूचक शब्द

खेड्याकडे चला, शहरीकरण, बेकारी, दारिद्र्य, औद्योगिकीकरण, लघु उद्योग, कुटीर उद्योग, सागरी अर्थनिती, तलाव अर्थनिती.

## संशोधनाचे उद्देश

१. महात्मा गांधीजीच्या औद्योगिकीकरण विषयक विचारांचा अभ्यास करणे.

२. महात्मा गांधी यांना अभिप्रेत असलेल्या अर्थव्यवस्थेचे अध्ययन करणे.

## गृहितके

१. महात्मा गांधीजींनी मर्यादित औद्योगिकरणाचा पुरस्कार केला आहे.

२. महात्मा गांधीजींना अभिप्रेत असलेली अर्थव्यवस्था जीवनाची उदात्त उद्दिष्टे साध्य करणारी आहे.

**संशोधन पद्धती**

वरील संशोधनात विश्लेषणात्मक संशोधन पद्धती व द्वितीय स्त्रोतांचा आधार घेतला आहे.

**प्रस्तावना**

मोहनदास करमचंद्र गांधी ज्यांना संपूर्ण जग महात्मा म्हणून ओळखते. या महान महामानवाचा जन्म 2 ऑक्टोंबर 1869 रोजी झाला होता. महात्मा गांधीजींनी ज्या भारताचे स्वप्न पाहिले होते त्यांचा विसर पडल्यास खरा आर्थिक विकास साध्य करणे शक्य नाही. महात्मा गांधीजींनी सामाजिक, आर्थिक, राजकीय, सांस्कृतिक जीवनाचा जो मार्ग मानवाला दाखवला त्यामुळे ते जगात अजरामर झाले आहेत. महात्मा गांधीजी अर्थशास्त्रज्ञ नव्हते पण त्यांच्या जीवनावर लिओ टॉयलस्टाय, जॉन रस्किन, गोखले यांचा प्रभाव असल्यामुळे त्यांनी भारतीय अर्थव्यवस्थेच्या विकासासाठी अर्थव्यवस्थेच्या वास्तविकतेचा अभ्यास करून 'खेड्याकडे चला' हा मंत्र दिला तो मंत्रच त्यांचे भारतीय अर्थव्यवस्थेसाठी मांडलेले आर्थिक विचार आहेत. गांधीजींना अभिप्रेत असलेली अर्थव्यवस्था खेड्यात वसलेली आहे. भारतातील बहूसंख्य जनता ही खेड्यात राहते त्यांचा विकास म्हणजेच अर्थव्यवस्थेचा विकास म्हणून खेड्यातील लघु कुटीर उद्योगांच्या विकासाला गांधीजींनी प्राधांन्य दिले आहे. गांधीजी अर्थशास्त्रज्ञ नसले तरी अर्थव्यवस्थेच्या विकासासाठी आवश्यक औद्योगिकीकरणाच्या मर्यादित विस्ताराचा त्यांनी मांडलेला आराखडा हा काल, आज आणि उद्याच्या भारताच्या शाश्वत विकासासाठी वरदान ठरणारा आहे.

**महात्मा गांधी यांचे औद्योगिकीकरण विषयक विचार**

1921 मध्ये भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेसची सुत्रे महात्मा गांधीजींनी हातात घेतल्यानंतर गरीबी निर्मूलन, आर्थिक स्वावलंबन, स्त्रियांचे समान हक्क इत्यादी विचारातूनच गांधीजींनी आर्थिक विकास साध्य करण्याचा नवा मार्ग सांगितला आहे. भारतीय अर्थव्यवस्थेच्या वेगवान विकासासाठी औद्योगिकीकरणाचे स्वरूप कसे असावे ते स्पष्ट केले आहे. त्याच्या या विस्कळीत विचाराचे संकलन करण्याचे काम त्यांच्या अनुयायांनी केले आहे. गांधीजींनी यांत्रिकीकरणावर भर देणाऱ्या भैतिकवादी पाश्चात्य संस्कृतीला नाकारल्यामुळे मानवी प्रगतीचे घड्याळ मध्ययुगात नेण्याचा निरर्थक प्रयत्न करणारी व्यक्ती अशी त्याच्यावर टिका झाली. (who was vainly trying to put back the clock of human program) टीकाकाराला नंतर आपली चूक लक्षात आली आहे. जगातील अनेक देश वाढत्या औद्योगिकीकरणाच्या गंभीर परिणामाला तोंड देत आहेत. म्हणून महात्मा गांधीजींनी मांडलेले मर्यादित, आवश्यकतेनुसार, औद्योगिकीकरणाची संकल्पना महत्त्वाची आहे. त्याचा अर्थ गांधीजींचा औद्योगिकीकरणाला विरोध होता असा काढण्याची चूक करू नये. महात्मा गांधीजी म्हणतात I am aiming not at the eradication of all machinery but limitation याचा अर्थ गांधीजींचा औद्योगिकीकरणाला, यांत्रिकीकरणाला विरोध नव्हता पण बेकारी निर्माण करणाऱ्या यांत्रिकीकरणाला विरोध होता. कारण लोकांना रोजगार पुरवण्याची क्षमता लघु व कुटीर उद्योगातच आहे. त्यांचे ते विचार त्रिकाल सत्य ठरले आहेत. 1965 च्या पाहणीनुसार लघु उद्योगात एका कामगाराला रोजगार मिळण्यासाठी 2,018 रुपये गुंतवावे लागतात, मध्यम उद्योगात एका कामगाराला रोजगार मिळण्यासाठी 4,044 रुपये तर मोठ्या उद्योगात एका कामगाराला रोजगार मिळण्यासाठी 17,751 रुपयाचे भांडवल गुंतवावे लागते. वरील विवेचना वरून रोजगार उत्पादन वाढ घडवून आणण्याची क्षमता ही लघु व कुटीर उद्योगातच असल्यामुळेच महात्मा गांधीजींनी लघु व कुटीर उद्योग उभारण्याच्या नीतीचा पुरस्कार केला आहे.

महात्मा गांधी यांचा यंत्रिकीकरणाला विरोध नव्हता, महात्मा गांधी मानवी शरीराला एक यंत्रच मानत होते. वाढत्या यांत्रिकीकरणमुळे (औद्योगिकीकरणमुळे) मानवाच्या गरजा वाढत जातात जीवनाची उदात्त उद्दिष्टे मागे पडून भौतिक सुखाच्या वाढत्या लालसेमुळे जीवनात ताणतणाव नैराश्य निर्माण होते. त्याचा अंतिम परिणाम युद्धे व हिंसा

वाढण्यात होतो. आवश्यक असलेल्या अवजड उद्योगासाठी यात्रिकीकरण आवश्यक आहे. पण अशा उद्योगाची मालकी सरकारकडे असावी ज्यामुळे समाजात मक्तेदारी निर्माण होणार नाही. तसेच समाजातील संपत्तीवर ताबा असलेल्या लोकांनी स्वत:ला संपत्तीचे मालक समजण्याची चूक करू नये कारण सर्व संपत्ती समाजाचीच आहे. संपत्तीची मालकी असलेले लोक केवळ संपत्तीचे रक्षक आहेत. महात्मा गांधीजींच्या या विचारातून मालक- मजूर, गरीब-श्रीमंत असा संघर्षच संपुष्टात आला आहे. महात्मा गांधीजींनी निसर्गत:च मुबलक उपलब्ध असलेल्या साधनांच्या वापराला 'सागरी अर्थनिती' तर मर्यादित उपलब्ध असलेल्या साधनांच्या वापराला 'तलाव अर्थनिती' संबोधले आहे. उदा. लोखंडाची उपलब्धता 'तलाव अर्थनिती' भाग आहे. लाकडापेक्षा लोखंडाची उपलब्धता कमी आहे. म्हणून स्पर्धा टाळण्यासाठी 'सागरी अर्थनिती' म्हणजे मुबलक उपलब्ध असलेल्या नैसर्गिक साधनाचा अधिक वापर करणे, स्पर्धा टाळण्यासाठी महत्त्वाचे ठरते. असे विचार महात्मा गांधीजींनी मांडले आहेत. औद्योगिकीकरणाच्या वाढत्या उत्पादन प्रक्रियेत खूप कमी लोकांचा सहभाग असतो. कमी लोकांकडून प्रचंड उत्पादन करण्यात आले तर मक्तेदारी, शोषण, हिंसा यात वाढ होते. शहराची अफाट वाढ थांबवण्यासाठी व त्यातून निर्माण होणाऱ्या समस्येवर उपाय म्हणून औद्योगिकीकरणातून होणऱ्या प्रचंड उत्पादनाला महात्मा गांधीजींनी वैयक्तिक उत्पादनाचा पर्याय सुचवला. वैयक्तिक उत्पादनात कांही पट वाढ घडवून त्याचे देखील महाकाय उत्पादनात रूपांतर करण्याचा जो मार्ग महात्मा गांधीजींनी सांगितला तो औद्योगिकीकरणाला पर्याय आहे. त्याच बरोबर देशातील बेकारी, दारिद्र्य, उपासमार, मक्तेदारी, हिंसा, शोषण इत्यादी समस्या समूळ नष्ट करण्यासाठी त्रिकाल मार्गदर्शक ठरणार आहे.

**निष्कर्ष**

१. महात्मा गांधीजीचा औद्योगिकीकरणाला विरोध नव्हता.
२. महात्मा गांधीजींनी सांगितलेल्या औद्योगिकीकरण विषयक विचारातून सामाजिक,
३. आर्थिक, राजकीय समस्यांची सोडवणूक झाली आहे.

**शिफारसी**

१. महात्मा गांधीजींच्या औद्योगिकीकरण विषयक विचारांचा स्वीकार करावा.
२. पाश्चात्य भौतिक संस्कृतीचा त्याग करून स्वदेशी, स्वराज्य, अहिंसा अपरिग्रह इत्यादी तत्वावर आधारलेल्या समाजवादी समाज रचनेची स्थापना करावी.

**समारोप**

महात्मा गांधीजींनी गरीबी निर्मूलन, आर्थिक स्वावलंबन, समान हक्क, समता, न्याय, मक्तेदारी नियंत्रणा संबंधी मांडलेले विचार समाजाला मार्गदर्शक ठरत आहेत. प्रचंड प्रमाणात वाढत्या औद्योगिकरणाचे दुष्परिणाम पाश्चात्य राष्ट्राला भोगावे लागत आहेत. म्हणूनच जगाला आज गांधीवादी विचारांची गरज आहे.

**संदर्भ सूची**

1. Srivasrava, S. K.- History of Economics thought, Publisher Chand, 1994, ISBN8121904552, 9788121904551
2. V.K.R.V. RAO-The Gandhian Alternative to Western Socialism Vol. 26, No. 4, (Oct-Dec 1970), pp. 331-352 Published By: Sage Publications, Ltd.
3. Radhakrishnan, s (Ed) Mahatma Gandhi 100 years. Pub-Imprint unknown, (1Dec1968) ISBN-10 : 071892035X 13 : 978-0718920357

4. Hirendranath Mukherjee-*Gandhiji A Study*. 1 January 1991. ISBN-13: 978-8170071464 ISBN-10: 8170071461
5. Harish C. K.-Mahatma *Gandhi a Study*: Being a *Study* of What He Is and What He Loves and (23 April 2018) ISBN-10-0331620049, ISBN-13 -978-0331620047
6. प्रमोद कपूर-गांधी सचित्र  जीवन दर्शन -मंजुळ प्रकाशन 2019- ISBN,10,1880312232
7. सुरेष द्वादशीवार-गांधीजी आंणि त्यांचे टीकाकार-2018 सधन प्रकाशन ASIN-B07NSS5P41H
8. रोमा रोला-महात्मा गांधी  जीवन और दर्शन- लोकभारती प्रकाशन,2008 ISBN,10,1880312232
9. पीयूष बबेल-गांधी सियासत और सांप्रदाईकता- जुनियन प्रकाशन मिडिया 2023. ISBN-10-9391659301
10. https://www.mkgandhi.org/ebks/marathi_ebooks.html